# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

क्रमांक :- झोपुप्रा/सा/उर्व-७/३१०
दिनांक :-

परिपत्रक क्र. १६३ दिनांक 2-NOV 2015

विषय:- झोपडपटटी पुनर्वसन योजनेतील अपिलमध्ये पात्र होणा-या झोपडीधारकांमुळे पुनर्वसन घटक इमारतीमधील सदनिकांच्या नियोजनातील बदल.

झोपडपटटी पुनर्वसन योजनेमधील पुनर्वसन घटक इमारतींना मूळ प्रमाणित परिशिष्ट-II प्रमाणे आराखडे मंजूर करुन बांधकाम परवाना देण्याल येतो. तथापि असे निदर्शनास येते की, अपिल मध्ये अपात्र झोपडीधारक पात्र होतात. अपात्र झोपडीधारक अपिलमध्ये पात्र होण्याची ही प्रक्रिया योजनेच्या अंतिम टप्प्यापर्यंत किंबहुना योजना पूर्ण झाल्यानंतरही सुरुच असते. परिणामी पुनर्वसन इमारतींचे आराखडे पुन्हा पुन्हा सुधारीत करुन मंजूर करावे लागतात. त्यामुळे पुनर्वसन सदनिकांच्या मूळ रचनेत बदल होतात व त्याबाबत तक्रारी प्राप्त होतात.

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने झो.पु. योजनेतील अपिलमध्ये पात्र होणा-या झोपडीधारकांची संख्या झो.पु. योजनेच्या एका निश्चित /विहित टप्प्यापर्यंत नक्की करणे आवश्यक झालेले आहे. सदर बाबतीत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-

१) पुनर्वसन घटक इमारतीला पुर्ण बांधकाम परवाना (Full C.C.) देईपर्यंत जे अपात्र झोपडीधारक पात्र होतील त्यांना योजनेत सामावून घ्यावे.

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६५६ ५८००, २६५९ ०४०५ / १८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल: info@sra.gov.in

२) पूर्ण बांधकाम परवाना (Full C.C.) दिल्यानंतर सुध्दा काही अपात्र झोपडीधारक पात्र झाले व पुनर्वसन इमारतीवर आणखी काही मजले/भाग बांधणे संरचनात्मकदृष्टया व इतर विनियमांचे पालन करुन शक्य असल्यास, तसे सुधारीत आराखडे मंजूर करुन बांधकाम परवाना दयावे. जर अभियांत्रिकी दृष्ट्या इमारतीत बदल करणे शक्य असल्यास किंवा सार्वजनिक सुविधाच्याबांधकामात बदल करणे गरजेचे होत असल्यास आणि अशा बदलाला सोसायटीची सहमती नसल्यास, नवीन पात्र झालेल्या झोपडीधारकांना नजीकच्या इतर योजनेमध्ये सामिल करण्यात यावा किंवा नजीकच्या योजनेच्या PAP मध्ये निवारा देय करण्यात यावा.

३) पुनर्वसन इमारतीस अंशतः/पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर व लॉटरीद्वारे पुनर्वसन सदनिकांचे वितरण/वाटप झाल्यानंतर व बालवाडी व इतर सामायिक सुविधा सदनिका संस्थेच्या ताब्यात दिल्यानंतर, अपिलमध्ये पात्र झालेल्या झोपडीधारकांना संबंधित योजनेत सामावून घेऊ नये. त्यांना नजिकच्या योजनेतील/ विभागातील उपलब्धतेनुसार PAP सदनिका दयाबे.

४) काही अपरिहार्य कारणांमुळे अंशतः/पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर व लॉटरीद्वारे पुनर्वसन सदनिकांचे वितरण/वाटप झाल्यानंतर आणि बालवाडी व इतर सामायिक सुविधा सदनिका संस्थेच्या ताब्यात दिल्यानंतर, जर अपिलमध्ये पात्र झालेल्या झोपडीधारकांना योजनेत सामावून घेण्यासाठी पुनर्वसन इमारतीच्या आराखडयांत बदल/सुधारणा करण्यापूर्वी संस्थेच्या महासभेच्या ठरावाद्वारे (GBR) संमती घेणे आवश्यक राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण